# आकाशवाणी नागपूर,
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)
# मंगळवार दिनांक ३० जून २०२६
# ठळक बातम्या

1. **MPSC ची भरती प्रक्रिया अधिक जलद, पारदर्शक आणि आधुनिक करण्यासाठी संगणक आधारित परीक्षा पद्धतीचा निर्णय.**
2. **महाराष्ट्रात विधानपरिषद उपसभापती पदासाठी सचिन अहिर यांचा महायुतीच्या पाठिंब्यावर अर्ज दाखल.**
3. **विदर्भातील शाळांमध्ये आज पासून किलबिलाट, विद्यार्थ्यांच्या प्रवेशउत्सवाचा सर्व शाळांमध्ये उत्साह.**

**आणि**

4. **विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यांत आज आणि उद्या मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट.**

## आता सविस्तर बातम्या .......

### महाराष्ट्र लोकसेवा आयोग

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या भरती प्रक्रिया अधिक जलद, पारदर्शक आणि कार्यक्षम करण्यासाठी संगणकाधारित परीक्षा -CBT पद्धत लागू करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती सामान्य प्रशासन मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी विधान परिषदेत आज दिली. दरवर्षी 50 ते 60 हजार पदांची भरती वेळेत पूर्ण करण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार असल्याचं त्यांनी सांगितलं. परीक्षांचे खाजगीकरण होणार नसून, केवळ परीक्षा घेण्यासाठी आवश्यक तांत्रिक यंत्रणा टीसीएससारख्या संस्थांकडून उपलब्ध करून घेतली जाईल, असंही त्यांनी स्पष्ट केलं. तसेच उमेदवारांना उत्तरपत्रिका उपलब्ध करून देणे आणि विविध शिफ्टमधील गुणांचे समानीकरण सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार करण्यात येणार असल्याचं शेलार यांनी सांगितलं .

### विधीमंडळ

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विधान परिषदेचे आमदार सचिन अहिर यांनी आज उपसभापती पदासाठी महायुतीचे उमेदवार म्हणून अर्ज दाखल केला. त्यानंतर पत्रकार परिषदेत बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सचिन अहिर हे आधी धनुष्यबाण चिन्हावरच विधान परिषदेत निवडून आल्याचे सांगत त्यांच्या

प्रवेशामुळे मुंबईसह राज्यात शिवसेनेची ताकद वाढेल, असा विश्वास व्यक्त केला. महायुतीकडे स्पष्ट बहुमत असून उद्या अहिर यांची विधान परिषद उपसभापतीपदी निवड होईल, असा दावाही त्यांनी केला. विधानपरिषदेच्या उपसभापतीपदाची निवडणूक उद्या होणार आहे. विधानपरिषदेच्या उपसभापती पदासाठी महाविकास आघाडीकडून शिक्षणतज्ज्ञ जगन्नाथ अभ्यंकर यांनी अर्ज दाखल केला आहे. सदनात आपली संख्या कमी असली तरी लोकशाही प्रक्रियेत भाग घेणं, ही विरोधी पक्ष म्हणून जबाबदारी असल्यामुळे या निवडणुकीत उतरत असल्याचं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार अंबादास दानवे यांनी सांगितलं. अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाबाबत बदर समितीच्या अहवालावर सूचना, हरकती विचारात घेऊनच व्यापक चर्चेअंती अंतिम निर्णय घेऊ, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिली. यात कोणावरही अन्याय होणार नाही, असं ते म्हणाले. उपवर्गीकरणाला विरोध नोंदवत या विषयावर बोलू देण्याची मागणी विरोधकांनी केली. अध्यक्षांनी त्यांना जागेवर बसायची सूचना केली, मात्र विरोधकांनी बोलू देण्याची मागणी लावून धरली आणि ती मान्य न झाल्याने सभात्याग केला. सन २०२३ ते मे २०२६ या कालावधीत राज्यात स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून महिलांचं शोषण, लैंगिक छळाच्या एकंदर ४ घटना, तर सक्तीच्या धर्मांतराची १ घटना घडल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. नागपूरमध्ये एका स्वयंसेवी संस्थेच्या संचालकाने तिथं काम करणाऱ्या तरुणींशी अश्लील वर्तन, लैंगिक छळ प्रकरणी उपस्थित केलेल्या प्रश्नावर ते बोलत होते. या प्रकरणातल्या आरोपींनी संस्थेत केलेले काही नियम धर्मस्वातंत्र्यावर घाला घालणारे आहेत, मात्र पीडितेवर किंवा तिच्या कुटुंबियांवर धर्मांतरासाठी दबाव आणल्याचं निष्पन्न झालेलं नाही, अशी माहिती त्यांनी दिली.

## खरीप पिकाची पेरणी

मान्सूनच्या पावसाचं आगमन लांबणीवर पडल्यामुळे देशात यंदा खरीप पिकाची पेरणी कमी प्रमाणात झाल्याचं कृषी मंत्रालयाने म्हटलं आहे. जून महिन्यात १८२ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे, गेल्यावर्षी याच काळात २३६ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली होती, त्यामुळे गेल्यावर्षीच्या तुलनेत यावर्षी पेरणीत २३ टक्के घट झाली आहे. भात, तेलबिया, भरड धान्य, कडधान्य, कापूस या सर्व पिकांवर पाऊस उशीरा आल्यामुळे परिणाम झाल्याचं कृषी मंत्रालयाने सांगितलं. भात पेरणीत २५ टक्क्यापेक्षा जास्त घट झाली आहे, कडधान्यात ३० टक्के, तेलबिया ५० टक्के

तर कापूस लागवडीत ३४ टक्के घट झाली आहे. दुसरीकडे उसाच्या लागवडीत ५७ टक्के वाढ झाल्याचं कृषी मंत्रालयाने सांगितलं.

आमदार सुलभा खोडके

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागण्यांवर चर्चा करतांना अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके यांनी जिल्ह्याचा गतिमान विकास आणि बळकटीकरणासाठी आवश्यक यंत्रणांना अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने भरीव निधीची मागणी केली. डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या मोक्याच्या १५२ एकर जागेवर 'अमरावती विभागीय कृषी संकुल' उभारण्यासाठी मंत्रालयात आधीच ठराव मंजूर झाला असून, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी देखील या ७० कोटींच्या विभागीय कृषी संकुलाच्या प्रकल्पाला हिरवी झेंडी दिली आहे. हे संकुल अमरावती विभागातील सर्व शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्वाचे असल्याने संकुल' उभारण्यासाठी ७० कोटींची पुरवणी मागणी मंजूर करण्याची विनंती खोडके यांनी शासनाला केली.

टीईटी पेपरफुटी

टीईटी पेपरफुटी प्रकरणात ठाणे पोलिसांनी मुख्य आरोपी बिजेंद्रकुमार गुप्ता याची पत्नी सुमनकुमारी हिला बिहारच्या पटणा शेरपूर इथून अटक केली आहे. या परीक्षेच्या प्रश्नपत्रिका आग्र्यात छापल्या गेल्या, त्या बिजेंद्रकुमार गुप्ता आणि त्याच्या साथीदारांनी आधी दिल्ली आणि त्यानंतर भिवंडीत आणल्या, आणि तिथे त्यांना पकडण्यात आलं. आग्र्यामधून आरोपींना प्रश्नपत्रिका मिळवून देणारे चार अन्य आरोपी फरार असून, ठाणे पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. दरम्यान या प्रकरणी शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी करत एनएसयुआय या काँग्रेसप्रणित विद्यार्थी संघटनेनं आज विधानभवन परिसरात निदर्शनं केली. निदर्शकांनी दादा भुसे यांना काळे झेंडे दाखवले. पोलिसांनी आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांना ताब्यात घेतलं.

उपेंद्र द्विवेदी

जनरल धीरज सेठ यांनी भारतीय सेनेचे ३१वे प्रमुख म्हणून कार्यभार स्वीकारला. या आधीचे लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी आज सेवानिवृत्त झाले. निवृत्त होताना त्यांनी भारतीय सैन्याच्या आणि सैनिकांच्या समर्पण वृत्तीला सलाम केला...

***(होल्ड बाईट- उपेंद्र द्विवेदी २०सेकंद)***

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

केंद्र सरकारने देशातल्या अपघातप्रवण स्थळं आणि दरडी कोसळण्याचा धोका असलेल्या स्थळांची नोंद केली असून ५० हजार कोटी रुपये खर्च करून त्यांची दुरूस्ती करण्यात येणार असल्याचं केंद्रीय रस्ते आणि वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितलं. ते नवी दिल्लीत रस्ते सुरक्षा या विषय़ावरल्या कार्यक्रमात आज बोलत होते. महामार्गावर दिशादर्शक फलकं, लेन मार्किंग, भुयारी मार्ग तयार करण्यासाठी प्रयत्न केले जातील असं ते म्हणाले. चालकांनी वाहतुकीच्या नियमांचं पालन करावं, गाडी चालवताना मोबाईल वापरणं टाळावं असं आवाहन गडकरी यांनी केलं.

## शाळा प्रवेशोत्सव

विदर्भातील 23 हजार 800 पेक्षा जास्त शाळा आजपासून सुरु झाल्या. शाळा समितीच्या मार्फत गणवेशाचे वाटप देखीलसुरु करण्यात आले. गणवेश निधीमध्ये कमतरता असेल तर निश्चितच राज्य सरकार यामध्ये लक्ष घालून त्या निधीत वाढ करून ती शाळा समितींना उपलब्ध करून देईल असं शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी आज नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं .सिताबर्डी येथील सेवा सदन संस्थेच्या शाळेत आज शाळा प्रवेश उत्सव कार्यक्रमात ते बोलत होते. नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी आज गडचिरोली जिल्हयातील विविध शाळांमध्ये नवागत विद्‌यार्थ्यांचे प्रभातफेरी काढून, गुलाबपुष्प देत आणि पाठ्यपुस्तक वितरीत करुन आनंददायी वातावरणात स्वागत करण्यात आले. जिल्हाधिकारी अविशांत पंडा यांनी गडचिरोलीनजीकच्या मुरखळा येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, तसेच आदिवासी विकास विभागाच्या शासकीय इंग्रजी माध्यम आश्रमशाळेत उपस्थित राहून शालेय जीवनात पदार्पण करणाऱ्या विद्‌यार्थ्यांचं गुलाबपुष्प देऊन स्वागत केलं. भंडाऱ्यात पीएम श्री लालबहादूर शास्त्री विद्‌यालयात नवीन शैक्षणिक वर्षानिमित्त प्रवेशोत्सव, नवीन विद्‌यार्थ्यांचा स्वागत समारंभ तसेच मोफत गणवेश आणि पाठ्यपुस्तक वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. जिल्हाधिकारी सावन कुमार यांच्या हस्ते विद्‌यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात गणवेश आणि पाठ्यपुस्तकांचं वितरण करण्यात आलं. यावेळी त्यांनी विद्‌यार्थ्यांना नियमित अभ्यास, शिस्त आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचं महत्त्व पटवून दिलं. यवतमाळ मध्ये जिल्हापरिषद, नगरपालिका, अनुदानित, विनाअनुदानित, आश्रमशाळा अशा एकूण 3,324 शाळांमध्ये आजपासून विद्‌यार्थ्यांचा किलबिलाट सुरू झाला. नवीन शैक्षणिक वर्षात 34 हजारांवर विद्‌यार्थी पहिली प्रवेश घेणार असून या

विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविण्यासाठी शाळांमध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले. अनेक गावांमधून विद्यार्थ्यांच्या मिरवणुका काढण्यात आल्या.

## कर्जमुक्ती लाभ

राज्य शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-2026' अंतर्गत जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात थेट कर्जमुक्तीची रक्कम जमा होण्यास सुरुवात होणार आहे. महाआयटीच्या माध्यमातून ही संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन आणि आधार क्रमांकावर आधारित राबविण्यात येत असून, पात्र लाभार्थ्यांच्या याद्या ग्रामपंचायत, बँका, गाव चावडी आणि आपले सरकार सेवा केंद्रांवर प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. लाभ मिळविण्यासाठी शेतकऱ्यांनी आधार आधारित बायोमेट्रिक प्रमाणीकरण करणे आवश्यक असून, एकवेळ समझोता (OTS) योजनेतील लाभार्थ्यांनी प्रथम त्यांचा वाटा जमा करणे बंधनकारक आहे. या योजनेमुळे लाखो शेतकरी पुन्हा कर्जमुक्त होऊन नव्याने पीक कर्ज घेण्यास पात्र ठरणार असल्याचं  शासनाने म्हटलं आहे.

## विशेष सखोल पुनरीक्षण

राज्यात मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेला आजपासून सुरूवात झाली. याअंतर्गत येत्या २९ जुलै पर्यंत मतदान-केंद्रस्तरीय अधिकारी म्हणजेच बीएलओ मतदारांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन गणना अर्ज वाटप करतील आणि भरलेले अर्ज परत घेतील. त्यानंतर येत्या पाच ऑगस्ट रोजी प्रारुप मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जातील. या प्रक्रियेसाठी राज्यात एक लाखाहून अधिक बीएलओ नियुक्त करण्यात आले आहेत.

## हवामान

राज्यात पुढच्या काही दिवसांत पावसाचा जोर वाढणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. २ आणि ३ जुलै रोजी विदर्भ आणि मराठवाड्याच्या काही भागांत विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान  विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये येत्या 4 जुलैपर्यंत मध्यम ते मुसळधार पावसासह वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या अंतर्गत आज नागपूर, गोंदिया, अमरावती या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून चंद्रपूर जिल्ह्यात देखील मुसळधार पावसाची शक्यता आहे. उद्या अमरावती, अकोला, बुलढाणा, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून वर्धा, यवतमाळ, भंडारा या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

यादरम्यान मेघ गर्जेनेसह सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी सतर्क रहावं असं हवामान विभागाने सांगितलं आहे.

*****